# जय गजानन

गुरू माता, गुरू पिता, गरू स्वामी कुलदेवता

गुरू वाचोनी सर्वथा आणिक देवता स्मरेना

साथारण १३ वर्षाची गोष्ट आहे, त्यावेळेस माझी बदली गोव्याला झाली होती. मडगाव, बोर्डा येथे भाडयाच्या घरात वास्तव्य सुरू केले. त्याअगोदर गुजरात येथे साधारण पाच वर्ष नोकरी केली. माझा पदव्युत्तर शीक्षण नागपूर येथे झाले. त्याच दरम्यान शेगावला जाण्याचा योग आला. तेंव्हापासुनच गजानन महाराजांविषयी ओढ लागून राहिली. माझी पत्नीदेखील गजानन महाराजांच्या पोथीचे पारायण नियमीत करते हे लग्नानंतर कळले.

नोकरीमुळे प्रथम गुजरात व नंतर गोव्यात रहावे लागले. दोन्हीकडे गजानन महाराजांचे मंदिर नसल्याने घरीच पोथीचे पारायण व नामस्मरण चालू होते. २००१ मधे गोव्यातील वर्तमानपत्रात श्री गजानन महाराजांच्या प्रगटदिना विषयी श्री उमेश चुरींनी दीलेली बातमी वाचली आणि आम्हा दोघांच्या आनंदाला पारावार उरला नाही. आम्ही उभयंतानी पत्ता शोधून हजर रहावयाचे ठरविले. मनामध्ये वाटत होते कि मंदिर कसे असेल? गोव्यामध्ये सुध्दा श्री गजानन महाराजांचे भक्त समुदाय आहेत हे समजल्याने खूप आनंद झाला. प्रगटदिनास सहकुटुंब हजेरी लावली. प्रथमतः थोडे आर्श्चय वाटले कारण मनामध्ये महाराजांचे मोठे मंदिर असेल असे वाटले होते परंतू प्रत्यक्षात पाहिले तर घोगल येथे एका भल्या मोठया वटवृक्षाखाली महाराजांचा मोठा फोटो लावलेला होता. प्रगटदिनाचा कार्यक्रम छान झाला. त्याचदिवशी कळले की प्रत्येक गुरूवारी संध्याकाळी ८ वाजता महाराजांची आरती होते. आम्ही न चूकता प्रत्येक गरूवारी आरतीस हजर राहू लागलो आणि महाराजांशी नाते अधिक दृढ झाले.

प्रथमतः दोनच कूटुंब व काही माणसे आरतीसाठी येत असत. महाराजांसाठी प्रसाद घरूनच घेउन जात असू. प्रगटदिन, रामनवमी, समाधी दिवस असे समारंभ साजरे होत होते. नंतर मंदिराला कुंपण घालण्यात आले. सर्व मंदिराजवळील राहणाऱ्या रहिवास्यांना मंदिराचे पावित्र्य राखण्यासाठी कचरा वगैरे न टाकण्याचे आवाहन केले. हळूहळू मंदिराविषयी एक अतोनात जवळीक निर्माण झाली. सुरूवातीस प्रगटदिनाच्या अगोदर सम्पूर्ण परिसर स्वच्छ करून शेणाचा सडा टाकण्यात येत होता. नंतर जमिनीवर सिमेंट कॉंक्रीट टाकण्यात आले. प्रगटदिन छोटयाखानी व व्यवस्थीत पार पडायचा.

हयादरम्यान सकाळी चालायची सवय होती. दररोज सकाळी बोडर्याहून मंदिरापर्यंत चालत जाउन मंदिर परिसर स्वच्छ करायची सवय लागली. दर गरूवारच्या आरतीस लोकांची संख्या वाढू लागली. यामुळे आम्हास बरीच मित्रमंडळी भेटली.

आध्यात्मीक प्रगती झाली. त्यामूळे आता कुठल्याही कामात, संकटात, आनंदात, दुःखात महाराजांचा मोठा आधार वाटतो. आमच्या सम्पूर्ण कुटुंबाचा श्वासच महाराजांच्या आधारे चालतो असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

या अशा छोटया कुंपणवजा देवळाचे एका मोठया मंदिरात रूपांतर झाल्याचे पाहून खूप धन्य धन्य वाटते. ह्या दरम्यान २००७ मधे माझी बदली पुण्यास झाली, परंतू महाराजांच्या मंदिरामुळे गोव्यातुन पाय काढण्यास खूप जड गेले. सध्याचे मंदिर साकारण्यासाठी श्री. गिरीश केणी, श्री. उमेश चुरी आणि इतर अनेक भक्त मंडळींनी अथक परिश्रम घेतले. गोव्यात म्हणजेच महाराष्ट्राच्या बाहेर महाराजांचे एक सुंदर मंदिर (मठ) निमार्ण केले. आता मंदिरात गोरगरिब व गरजू लोंकाची सेवा केली जाते. हे सर्व अनुभवताना आम्हा दोघांना श्री गजानन महाराजांनीच हे सर्व घडवून आणले याची प्रचिती येते.

आम्हा दोघांकडून श्री गजानन महाराज मठास मनापासुन शुभेच्छा !

महाराजांनी दाखवून दिलेल्या आर्दशाप्रमाणे म्हणजेचः

- अन्नाची नासाडी न करता, अन्न हे पूर्णब्रम्ह समजावे
- नेहमी सत्य बोलावे, सत्याचा विजय अटळ आहे
- शरिराची, मनाची व आपल्या सभोवतालची स्वच्छता राखणे...... हीच खरी महाराजांची भक्ती होय.

शेवटी राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या शब्दात वर्णन करावयाचे झाल्यासः

“मना भासे गजानन, अवतार देवाचा, कराया कार्य जनतेचे, प्रगटला मानवी साचा, ही धारणा दृढ होवो ही गजानन चरणी प्रार्थना”

ॐ गजानन नमो नमः , श्री गजानन नमो नमः, जय गजानन नमो नमः, गुरू गजानन नमो नमः

डॉ. अनिल व प्राची कुमणे, पुणे (०८८८८८४३९०७)